ठाणे, मंगळवार दि. १८ जून २०२४ वर्ष : १३, अंक : ५१ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

**भुजबळांची राजकीय भूमिका**

छगन भुजबळ यांच्या नावाची लोकसभेच्या नाशिक येथील जागेसाठी चर्चा सुरू असताना त्यांना डावलले गेले. आता राज्यसभेला नावाची चर्चा असताना ....पान २ वर


# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे




पावसाळा आला, सामान्य सर्दीकडे दुर्लक्ष नको ...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७२,५५० | ९३,५०० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



महान नेते रावसाहेबांनी विनाकारण आमच्या महासंघटनाला विनाशर्त पाठींबा दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन!

**थोडक्यात घडामोडी**



## घोडबंदर किल्ल्यात सापडले तळघर?

ठाणे – मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील घोडबंदर येथील किल्ल्याच्या सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे, यादरम्यान प्रवेशद्वाराच्या कमानीसाठी खोदकाम सुरू असताना त्या ठिकाणी छोटे तळघरसदृश बांधकाम आढळले आहे. हे भुयार असण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. याबाबत पुरातत्त्व विभागाला कळवण्यात आले असून संबधित अधिकारी आल्यावर या रहस्याचा उलगडा होणार आहे. शासनाच्या संरक्षित स्मारक योजनेनुसार मिरा-भाईंदर महापालिकेला घोडबंदर किल्ला देखभाल, दुरुस्ती आणि सुशोभिकरण यासाठी दत्तक देण्यात आला आहे. १४ कोटी रुपये खर्चून किल्ल्याचे सुशोभिकरण करण्यात येत असून हे काम आता अंतिम टप्प्यात आहे. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ कमानीसाठी खोदकाम सुरू असताना काही तळघर आणि बाजूला गवाक्ष दिसून आले आहे. या किल्ल्यातून एक भुयारी मार्ग निघत असावा असा अंदाज यामुळे व्यक्त केला जात आहे. याबाबत पालिकेने पुरातत्त्व विभागाला कळवले आहे. पुरातत्त्व विभागाचे अधिकारी मंगळवारी येथे पाहणी करण्यासाठी येणार आहेत.

## मालगाडी आणि एक्स्प्रेस रेल्वेची धडक

**15 जणांचा मृत्यू**





पश्चिम बंगालमधील सियालदहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसला सोमवारी (१७ जून) सकाळी न्यू जलपाईगुडीजवळ अपघात झाला. या एक्सप्रेसला मालगाडीने मागून जबर धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की मालगाडीची धडक बसल्यानंतर एक्सप्रेसच्या तीन बोगी रुळावरून घसरल्या. तर अनेक बोगी हवेत उचलल्या गेल्या. १५ जणांचा यामध्ये मृत्यू झाल्याची माहिती आहे, हा आकडा वाढूही शकतो. तर, मोठ्या संख्येने लोक जखमी झाले आहेत. या अपघातताचे कारण सिग्नलमध्ये बिघाड असल्याचे सांगण्यात आले आहे.

# राज्यात 19 जूनपासून पोलीस भरती सुरू

## पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीबाबत महाराष्ट्र पोलीस दलाचा मोठा निर्णय, विद्यार्थ्यांना देता येणार दोन परिक्षा

मुंबई : राज्यात सुरु असलेल्या पोलीस आणि राज्य राखीव पोलीस दलाच्या भरतीतील मैदानी परिक्षेच्या तारखा या एकाच दिवशी किंवा सलग दिवशी लागून आल्याने राज्यभरातील लाखो विद्यार्थी चिंतेत आहेत, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी मांडला होता. सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता पोलीस भरती व एसआरपीएफ (SRPF) भरतीच्या तारखा बदलाव्यात अशी मागणी त्यांनी केली होती. महाराष्ट्र पोलीस दलाकडून या मागणीची दखल घेण्यात आली आहे. पोलीस भरती २०२२-२३ मध्ये ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केले आहेत व त्यांची मैदानी चाचणी एकाच दिवशी आली असेल अश्या उमेदवारांना किमान ४ दिवस अंतराने वेगवेगळ्या तारखा दिल्या जातील, असा निर्णय घेतल्याची माहिती महाराष्ट्र पोलिसांनी दिली आहे. (पान २ वर)



## ठाणे ग्रामीण पोलीस भरती: ११९ पदांसाठी प्रक्रिया सुरू

७०१९ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असून यामध्ये १०१५ महिलांचे अर्ज तर पुरुषांचे ६००४ अर्ज प्राप्त झालेत.

(सविस्तर वृत्त पान २ वर)

## ठाणे पोलीस विभागात ६८६ पदांची भरती

या पोलिस भरतीत ६६६ पदासाठी ३८ हजार ७८ पुरुष आणि महिलांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. पोलिस शिपाईच्या भारतीसाठी ३० हजार १५५ उमेदवारांनी आणि ७ हजार ९२३ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तर चालक पदाच्या २० जागांसाठी १ हजार ५२७ अर्ज प्राप्त झालेले आहेत. यात १ हजार ४०८ पुरुषांनी तर ११९ महिला चालकांनी अर्ज केले आहेत. (सविस्तर वृत्त पान २ वर)

## सर्वतोपरी व्यवस्था सुनिश्चित, उमेदवारांसाठी राहण्याची व्यवस्था..

जे उमेदवार भरतीसाठी मुंब्रा येथे भरतीसाठी येणार आहेत. त्यांची गैरसोय होणार नाही याची संपुर्ण काळजी घेतली जाणार आहे. या भरती प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी पार पडणार आहे. सध्या पावसाचे दिवस आहेत. म्हणून १०० मीटरचा जो ट्रॅक आहे त्या ठिकाणी पुर्णपणे वॉटरप्रुफिंग करण्यात येणार आहे. जे उमेदवार मध्यरात्री येतील किंवा पहाटे येतील त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. अशी माहितीही डॉ.डी.एस.स्वामी यांनी दिली आहे. इतकेच नाही तर आरोग्याच्या दृष्टीकोनातून उमेदवारांसाठी ॲम्ब्युलन्स असणार आहे. तसेच कोणत्या उमेदवाराला काही शंका असतील तर तातडीने त्या शंकाच निरासन करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

## देशात जाती जनगणना करण्यात यावी

- छगन भुजबळांची मोठी मागणी
- ही जनगणना झाली तर ओबीसींना....



मुंबई – देशात जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केली आहे. तसेच ही जनगणना झाली तर याचा देशातील ओबीसींना मोठा फायदा होईल आणि त्यांना केंद्रातून मोठ्या प्रमाणात निधी मिळेल, असेही ते म्हणाले. आज झालेल्या समता परिषदेच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना छगन भुजबळ यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. (पान २ वर)

नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान झाले आहेत. आता आम्ही त्यांच्याकडे मागणी करणार आहोत की त्यांनी जातीनिहाय जनगणना करावी. ती केली तर ओबीसींच्या विविध मुद्द्यांवर प्रकाश पडेल. नुसतीच लोकसंख्या समजणार नाही तर ओबीसींची परिस्थितीदेखील आपल्याला समजेल. त्यामुळे केंद्र सरकारकडून मिळणारा निधी, जो आता केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना मिळतोय तो ओबीसींना देखील मिळू शकेल. परंतु, त्यासाठी जनगणना व्हायला हवी. – छगन भुजबळ

## दुर्गाडी किल्ल्यावर बकरी ईदनिमित्त नमाज पठण, मंदिरात प्रवेश नाकारल्याने शिवसेनेचा घंटानाद

**उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे दोन्ही शिवसेनेचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी**

मुंबई – बकरी ईदच्या निमित्ताने मुस्लिम समुदायाने कल्याणच्या दुर्गाडी किल्ला या भागात असलेल्या मशिदीत नमाज अदा केली. यानंतर दुर्गाडी किल्ल्याबाहेर एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना अशा दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घंटानाद आंदोलन केलं. तसंच आम्हाला मंदिरात प्रवेश दिला जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच राहिल अशीही भूमिका घेतली आहे. बकरी ईदच्या दिवशी कल्याणच्या दुर्गाडी देवीच्या दर्शनासाठी बंदी घातली जाते. मात्र ९० च्या दशकात आनंद दिघेंनी याचा विरोध करत या ठिकाणी घंटानाद आंदोलन सुरु केलं. आज पुन्हा एकदा या ठिकाणी घंटानाद आंदोलन करण्यात येतं आहे. आंदोलक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. (पान २ वर)



### आनंद दिघेंनी सुरु केलं होतं घंटानाद आंदोलन

दुर्गाडी किल्ल्यावर देवीचं मंदिर आहे तसंच त्याच परिसरात एक छोटी मशिदही आहे. त्या ठिकाणी मुस्लिम समुदाय बकरी ईदच्या निमित्ताने नमाज पठण करण्यासाठी येत असतो. त्या काळात हिंदू बांधवांना देवीचं दर्शन आणि पूजा ही काही काळासाठी बंद ठेवण्यात येते. याचा निषेध आनंद दिघेंनी सुरु केला होता. त्यांनी या विरोधात घंटानाद आंदोलन सुरु केलं होतं. आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे कार्यकर्तेही या ठिकाणी घंटानाद करताना दिसत आहेत. आम्हाला दुर्गाडी देवीचं दर्शन करायचं आहे त्यामुळे मंदिरात जाऊ दिलं पाहिजे असं या आंदोलकांचं म्हणणं आहे. मात्र पोलिसांनी मंदिरात जाण्यापासून रोखल्याने या ठिकाणी आंदोलन सुरु करण्यात आलं आहे.





मुस्लिम बांधवांनि 'ईद-उल-अजहा' अर्थात बकरी ईद च्या निमत्ताने ठाणे, चराई येथील ईदगाह मध्ये नमाज पठण केले त्या नंतर एकमेकांना शुभेच्छा दिल्या यावेळी नौपाडा पोलीस यांच्या तर्फे गुलाब पुष्प देउन शुभेच्छा देण्यात आले. (छाया – मनोज सिंह)

## कल्याणमधील ठाकरे गटाच्या नव्या नेमणुका, सामान्य शिवसैनिकांमध्ये नाराजी

कल्याण: कल्याण लोकसभा निवडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांचा पराभव झाला असला तरी त्यांना चांगली मते मिळाली. त्याचा विचार करून आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून पक्षाने कल्याण लोकसभा मतदारसंघातील अनेक पदाधिकाऱ्यांच्या नव्याने नेमणुका केल्या आहेत. या नेमणुका निष्ठावंत, ज्येष्ठांना डावलून करण्यात आल्याचा आरोप करत सामान्य, निष्ठावंत शिवसैनिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याविषयी उघडपणे कुणीही बोलण्यास तयार नाही. शिवसेनातील बंडानंतर कल्याण परिसरातील अनेक जुने निष्ठावान, ज्येष्ठ शिवसैनिकांनी उध्दव ठाकरे यांना साथ दिली. अशा शिवसैनिकांना नवीन नेमणुकांमध्ये पदस्थापना देऊन त्यांचा सन्मान करणे आवश्यक होते. परंतु त्यांना डावलण्यात आल्याने त्यांच्यामधून नाराजीचा सूर उमटत आहे, असे ठाकरे गटातील ज्येष्ठ शिवसैनिकांकडून सांगण्यात आले. कल्याण लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाकडून निवडणूक लढविणाऱ्या वैशाली दरेकर यांनी तीन लाख ८१ हजार मते मिळविली. त्याचा विचार करून ठाकरे गटाने आता आगामी विधानसभा, महापालिका निवडणुकींच्या तयारीचा भाग म्हणून येथील पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत.

कल्याण पश्चिम, मुरबाड विभागासाठी ॲड. अल्पेश भोईर यांची जिल्हाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भोईर हे उच्चशिक्षित आहेत. त्यांच्या नियुक्तीला कोणाचा विरोध नाही, पण त्यांना टप्प्याने पदोन्तीने पद देणे आवश्यक होते, असे सामान्य शिवसैनिकांचे मत आहे. कल्याण पूर्व, उल्हासनगर, अंबरनाथ शहरासाठी जिल्हाप्रमुख म्हणून धनंजय बोडारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत केलेल्या कामाची पावती म्हणून त्यांना हे पद दिल्याचे सांगण्यात येते. नगरसेवक, विभागप्रमुख, दोनदा विधानसभा उमेदवारी, उपशाखाप्रमुख पदे धनंजय बोडारे यांनी भुषविली आहेत. आता जिल्हाप्रमुख पदही त्यांना देण्यात आले आहे. अनेक पदे एकाच व्यक्तिला किती वेळ देणार. इतरही अनेक ज्येष्ठ कृतीशील शिवसैनिक पक्षात आहेत. त्यांचाही विचार होण्याची गरज आहे, अश मागणी सामान्य शिवसैनिक करत आहेत.

दरेकर यांचे मताधिक्य वाढविण्यासाठी ज्यांनी महत्वाची भूमिका बजावली त्यांच्या पदरात नव्याने नेमणुका टाकण्यात आल्याची चर्चा सामान्य शिवसैनिकांमध्ये आहे. ठाकरे गटाचे नेते (पान २ वर)

पक्षाकडून करण्यात आलेल्या नव्या नेमणुकांमध्ये कोणतीही नाराजी नाही. याऊलट पक्षाने युवा कार्यकर्त्यांना प्राधान्य दिल्याने शिवसैनिक आनंदात आहेत. – सदानंद थरवळ (जिल्हाप्रमुख, कल्याण जिल्हा)

## राजकीय आकासापोटी कोपरीतील श्रमदान सोसायटी धोकादायक घोषित करण्याचा घाट

**स्टक्चर ऑडिट रिपार्टमध्ये सत्य आले समोर**

ठाणे (बिपीन अढांगळे)– रविवारी ठाण्याच्या कोपरी मीठबंदर परिसरातील श्री स्वामी समर्थ मठाजवळ असलेल्या श्रमदान सोसायटीच्या इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅटचे प्लास्टर पडून पिलरला तडे गेल्याची घटना घडली. या घटनेत तीन जण जखमी झाले असता त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करून घरी पाठविण्यात आले. अशी बातमी सर्वत्र व्हायरल झाली. परंतु या बातमीची सत्य परिस्थिती काहीशी वेगळी असल्याचे स्थानिक नागरिकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले आहे. ठाणे पालिकेने जारी केलेल्या ठाणे महापालिका, नौपाडा कोपरी प्रभाग समिती सन २०२४-२५ धोकादायक इमारती यादीमध्ये श्रमदान सोसायटी बिल्डींग नं. ३ चा कुठेही उल्लेख नसताना केवळ बिल्डरच्या घशात घालण्यासाठी राजकीय आकासापोटी पोलीस व पालिका अधिकाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी बोलावून सदर बिल्डींग सिल करून नागरिकांना वेठीस धरण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्यासाठी बिल्डिंगची गॅस लाईन, पाणी लाईन, इमारतीमधील लाईट, रोडवरील दिवे बंद करण्यात आले आहे, त्यानंतर नागरिकांनी ऑडिट रिपार्ट काढला असता ही इमारत सुरक्षित असल्याचे म्हटले आहे, त्यामुळे हे केवळ राजकीय आकासापोटी करण्यात आल्याचा संशय रहिवाशांनी व्यक्त केला आहे.



येथील रहिवाशांचे म्हणणे आहे की, आमच्या इमारतीतील ज्या खोलीतील स्लॅब कोसळला आहे. त्या खोलीतील केवळ प्लास्टर पडले आहे. १९९९ ची ओसी आहे, अजून ही इमारती बांधून २५ ते ३० वर्ष सुध्दा पूर्ण झाली नसताना ह्या इमारतीला कसे काय धोकादायक घोषित करतात? तसेच आम्हाला या इमारतीचे ऑडिट करण्यासाठी पुरेसा वेळ द्या, अचानक पालिकेची धोकादायक इमारत म्हणून नोटीस बजावली आहे आणि इमारतीचा पाणी, लाईट, गॅस लाईन बंद करून नागरिकांना वेठीस धरणे आहे, हे योग्य नाही. ऐन पावसाळ्यात येथील (पान २ वर)

### रहिवाशांनी करून घेतले स्टक्चर ऑडिट

स्थानिक नागरिकांनी त्वरित स्टक्चर ऑडिट करून घेतला आहे, या बिल्डींगला सीटूसी कॅटगरीचा गोव्हर्मेंट ऑडिट देण्यात आला आहे. या ऑडिट रिपोर्टनुसार सदर बिल्डींग रिपेअर करून राहण्या जोगी आहे. ती इमारत धोकादायक ठरत नाही, असे म्हटले आहे, तसेच ऑडिटर यांनी ही रहिवाशांना ऑडिट रिपोर्टमध्ये सांगितल्याप्रमाणे स्लॅबच्या खाली स्टीलला गंज लागल्यामुळे सिमेंटचे कव्हर काँक्रीट काढून त्याजागी नवीन कॉक्रीट करणे आवश्यक आहे. त्यासाठी जॅक गुदे लावून ते रिपेअर करू शकतात, असे मार्गदर्शन सुध्दा केले आहे.

### रहिवाशांनी सोडला सुटकेचा श्वास

ऑडिट रिपोर्ट आल्यानंतर रहिवाशांनी ऑडिटर यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही पालिकेला हा ऑडिट रिपोर्ट सादर करू व लाईट, पाणी, गॅस कनेक्शन सुरू करून घेऊन, पुढे आम्हाला पाच ते दहा दिवसात आम्ही सांगितल्याप्रमाणे आमच्या खोलीची रिपेअरिंग करून घेऊ. त्यामुळे ऑडिट रिपोर्टनुसार ही बिल्डींग धोकादायक नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. आता पालिका हे सिल काढणार की नाही, पाहावे लागणार आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## भुजबळांची राजकीय भूमिका

छगन भुजबळ यांच्या नावाची लोकसभेच्या नाशिक येथील जागेसाठी चर्चा सुरू असताना त्यांना डावलले गेले. आता राज्यसभेला नावाची चर्चा असताना भुजबळांना नाकारण्यात आले. त्यामुळे भुजबळांनी कुठेतरी वेगळा विचार करण्याची गरज आहे, अशी भावना समता परिषदेच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी गटाचे भुजबळ हे ज्येष्ठ नेते आहेत. मागील काही दिवसांपासून अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांतर्गत सुरु असलेली गटबाजी, ओबीसी आरक्षणाचा प्रश्न, इच्छुक असतानाही लोकसभेला न मिळालेले तिकीट, राज्यसभेला डावलले जाणे हे मुद्दे भुजबळांची राजकीय प्रतिष्ठा कमी करणारे आहेत. त्यामुळे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. भुजबळांनी आतातरी ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली आहे. मुंबईतल्या एमईटी सेंटरमध्ये छगन भुजबळांच्या उपस्थितीत समता परिषदेची नुकतीच बैठक झाली. त्यात भुजबळांच्या कार्यकर्त्यांनी भुजबळांनी वेगळी भूमिका घेण्याची मागणी केली आहे. यावर छगन भुजबळ कोणता निर्णय घेणार हे येत्या काही दिवसांत पाहायला मिळेल, असे दिसते.

मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली समता परिषदेची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीला समता परिषदेचे सर्व महत्त्वाचे नेते उपस्थित होते. या बैठकीत नाराजीचा सूर पाहायला मिळाला. छगन भुजबळांवर अन्याय होत असल्याची भावना कार्यकर्त्यांनी मांडली. पक्षामध्ये कुठेतरी अंतर्गत गटबाजी आहे. राज्यसभेला नावाची चर्चा असताना भुजबळांना नाकारण्यात आले त्यामुळे कुठेतरी वेगळा विचार करण्याची गरज आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी मांडली आहे. दुसरीकडे काही कार्यकर्त्यांनी, सरकारमध्ये असला तर ओबीसी आरक्षणाचा प्रश्न आक्रमकपणे मुद्दा लावून ठेवावा लागेल. जेणेकरुन मराठा आरक्षण ओबीसीतून मिळाले नाही पाहिजे. मराठा आरक्षणाचा फटका ओबीसीना बसता कामा नये यासाठी आक्रमक भूमीका मांडा अशी मागणी करण्यात आली आहे. भुजबळांनी आतातरी ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली.

बैठकीदरम्यान छगन भुजबळांनी ॲडव्होकेट मंगेश ससाणे आणि लक्ष्मण हाके यांच्याशी फोनवरून संवाद साधला. जातनिहाय जनगणनेसाठी पंतप्रधान मोदींकडे मागणी करणार असल्याचे छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे भुजबळ राज्याच्या सत्तेत मंत्री असताना ओबीसी आरक्षणाची मागणी मांडत होते. साहजिकच त्यांना मराठा आरक्षण आंदोलकांनी विरोध केला होता. एवढेच नाही तर भुजबळांचे मंत्रिपद काढून घ्या, अशी मागणीदेखील सहकारी पक्षांतील अनेक नेत्यांनी केली होती. अजित पवार गटाचे अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे की, छगन भुजबळांच्या नाराजीच्या बातम्या येत आहेत त्या जाणूनबुजून सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसारित केल्या जात आहेत. अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणतीही अंतर्गत गटबाजी, कलह नाही. समता परिषद आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही वेगळे आहे. समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी भूमिका मांडली असेल, पण भुजबळ नाराज नाहीत. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळू नये यासाठी जालन्यातील वडीगोद्री गावात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे तर मागील काही दिवसांपासून मंगेश ससाणे यांचे पुण्यात उपोषण सुरु आहे. लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा आरक्षणाचा मुद्दा राज्यात तापला असताना मंत्री छगन भुजबळ यांना पक्षात डावलले जात आहे का,अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी पक्षात छगन भुजबळ नाराज असल्याची चर्चा सुरू झाली आहे. छगन भुजबळ यांनी मुंबईत तातडीने समता परिषदेची राज्यस्तरीय बैठक बोलावल्याची माहिती होती. ही समता परिषदेची बैठक नसून राज्यातील विविध भागातील ओबीसी बांधवांचा मेळावा होता व ते भेटीसाठी आले होते, असे भुजबळ यांनी म्हटले आहे. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही याची लेखी हमी सरकारने द्यावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यात काही ओबीसी नेते आमरण उपोषण करीत आहेत. या उपोषणाकर्त्यांची विचारपूस करण्यासाठी भुजबळांनी त्यांना संपर्क केल्याचे म्हटले आहे. राज्यातील काही ओबीसी बांधवांनी भुजबळांना भेटण्याची विनंती केली होती. त्यानुसार, राज्याच्या विविध भागांतील ओबीसी बांधवांना भेटून सध्याच्या राजकीय व सामाजिक विषयावर चर्चा केली. आम्ही सगळं वकिलांशी कायदेशीर चर्चा करून सगेसोयरे या पेपर्सवरही चर्चा करू, जिथे ओबीसीवर अन्याय होत असतील किंवा सुधारणा करण्याची गरज असेल तिथे सुधारणा करू, असे आश्वासन छगन भुजबळ यांनी ओबीसी समाजाच्या बैठकीत दिले आहे. भारत सरकारने जातनिहाय जनगणना करावी, अशी ओबीसींची मागणी आहे. त्यामुळे खरोखरच किती ओबीसी आहेत हे कळेल. जातनिहाय आकडेवारीचा हिशोब देखील यामुळे लागेल. त्यामुळे, केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना केली पाहिजे, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे. राहिला मुद्दा, भुजबळांना राजकारणात डावलण्याचा ! भुजबळच यावर योग्य तो निर्णय घेतील, अशी अपेक्षा आहे.

जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

☆ मिळकट नोटीस
☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस
☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा
☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

## राज्यात १९ जूनपासून पोलीस भरती सुरू

**(पान १ वरून)** महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील रिक्त पदे भरणे साठी मैदानी चाचणी परीक्षा १९ जून पासून संपूर्ण राज्यभर सुरु होणार आहे. उमेदवारांना विविध पदांकरिता (पोलीस शिपाई, चालक, बँडसमन, सशस्त्र पोलीस शिपाई, तुरुंग विभाग शिपाई) एका घटकात किंवा वेगवेगळ्या घटकांत अर्ज करता येतात. त्यानुसार काही उमेदवारांना एकाच दिवशी अथवा लागोपाठचे दिवशी दोन पदांकरिता मैदानी चाचणी साठी हजर राहणे बाबत ची स्थिती निर्माण होवू शकते व त्यामुळे काही उमेदवारांची गैरसोय होवू शकते. यामुळं म्हणून सर्व घटक प्रमुखांना व चरहरळीं विभागास सूचना देण्यात आली आहे की, ज्या उमेदवारास एकच वेळी दोन पदांकरिता मैदानी चाचणीस हजर राहणे साठी सूचना दिली असेल असा उमेदवार पाहिल्या ठिकाणी हजर राहिल्या नंतर त्या उमेदवारांना दुसरी ठिकाणी वेगळी तारीख देण्यात यावी, अशा सूचना केल्याचं महाराष्ट्र पोलिसांच्यावतीनं सांगण्यात आलं आहे.

दुसऱ्या ठिकाणचे घटक प्रमुखांनी अशा उमेदवारांची मैदानी चाचणी घ्यावी. तसेच मैदानी चाचणी ची पहिली तारीख आणि दुसरी तारीख यामध्ये किमान ४ दिवसांचे अंतर असावे. मात्र या करिता उमेदवार पहिल्या मैदानी चाचणीस हजर होता याचे लेखी पुरावे दुसऱ्या मैदानी चाचणी वेळी सादर करावे लागतील, असं पोलीस दलाकडून सांगण्यात आलं आहे.

पोलीस भरती आणि SRPF भरतीची मैदानी परीक्षा एकच दिवशी आल्याने राज्यभरातील विद्यार्थांच्या भावना लक्षात घेऊन पोलीस भरती करणाऱ्या युवांना दोन्ही मैदानी परीक्षांना परवानगी देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल सरकारचे आभार, असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. आता ऐन पावसाळ्यात भरती प्रक्रिया होत असल्याने मैदानी चाचणीस येणाऱ्या युवकांना त्रास होणार नाही यासाठी सरकार निवाऱ्याबाबत आवश्यक ती पावलं उचलेल, ही अपेक्षा असल्याचं रोहित पवार म्हणाले.

## देशात जाती जनगणना करण्यात यावी

**(पान १ वरून) राज्यपातळीवर जनगणना करून फायदा होणार नाही–** जाती जनगणना केवळ राज्यपातळीवर करून फायदा होणार नाही. तर ती देशपातळीवर करावी लागेल. केवळ राज्याच्या पातळीवर ही जनगणना झाली तर आपल्याला फक्त माहिती मिळेल. परंतु, केंद्राचा निधी मिळणार नाही. त्यामुळे केंद्राकडून निधी कशाप्रकारे मिळवता येईल याबाबत आज समता परिषदेच्या बैठकीत चर्चा झाली, असेही त्यांनी सांगितलं. तसेच केंद्र सरकारने जाती जनगणना करण्याचा निर्णय घेतला तर त्याचा आम्हाला आनंद होईल, त्यामुळे प्रत्येक समाजाची योग्य संख्या समजणं सोपं जाईल, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

**ओबीसींवर अन्याय होत असेल तर योग्य ती पावले उचलू–** पुढे बोलताना त्यांनी ओबीसी नेत्यांकडून सुरु असलेल्या उपोषणावरही भाष्य केलं. राज्यात काही लोक ओबीसींसाठी उपोषणाला बसले आहेत. आम्ही त्यांना माघार घेण्याची विनंती केली आहे. येत्या दोन दिवसांत आम्ही वकिलांशी बोलणार आहोत. काही कागदपत्रेदेखील आम्ही तयार केली आहेत. जर कुठं ओबीसींवर अन्याय होत असेल तर आम्ही त्यासंदर्भात योग्य ती पावले उचलू, असेही ते म्हणाले.

**तर मी स्वत: आंदोलन करेन –** दरम्यान, सरकार आमचं ऐकत नाही, अशी तक्रार काही ओबीसी नेत्यांनी छगन भुजबळ यांच्याकडे केली होती. यासंदर्भात बोलताना, मला आधी माहिती घेऊ द्या, त्यानंतर आपण आपल्या मागण्या सरकारकडे मांडू, त्यानंतरही सरकारने ऐकलं नाही, तर मी स्वत: आंदोलन करेन, असेही भुजबळ यांनी सांगितलं.

## दुर्गाडी किल्ल्यावर बकरी ईदनिमित्त नमाज पठण, मंदिरात प्रवेश नाकारल्याने शिवसेनेचा घंटानाद

**(पान १ वरून) उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे दोन्ही – शिवसेनेचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी–** दुर्गाडी किल्ल्यावर मोठ्या प्रमाणात शिवसनैकि जमले होते. विशेष म्हणजे या आंदोलनादरम्यान उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचेही काही कार्यकर्ते उपस्थित होते. एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांचे यांचे कार्यकर्ते एकमेकांत मिसळू नयेत आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी हे दोन्ही गट वेगळे ठेवण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. या दोन्ही गटांनी दुर्गाडी किल्ला परिसरात काही काळ घोषणाबाजी केली. यावेळी पोलिसांचा मोठा फोजफाटा तैनात करण्यात आला होता.

**आंदोलकाचं म्हणणं काय?** – बकरी ईदच्या दिवशी दुर्गाडी किल्ल्यावर प्रवेश बंदी आणि घंटानाद करु दिला जात नाही. हे आंदोलन बाळासाहेब ठाकरेंच्या आदेशाने सुरु झालं आहे. बाळासाहेब ठाकरेंनी बंदीहुकूम मोडून देवीचं दर्शन घेतलं होतं. आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन आम्ही चालू ठेवणार. कोणत्याही दिवशी देवीच्या मंदिरात प्रवेश करण्यासाठी बंदी असता कामा नये. देवीचं दर्शन घेणं हा हिंदूंचा हक्क आहे. असं आंदोलकांनी म्हटलं आहे.

## राजकीय आकासापोटी कोपरीतील श्रमदान सोसायटी धोकादायक घोषित करण्याचा घाट

**(पान १ वरून)** नागरिकांनी कुठे जायचे? तसेच त्यांच्या मुलांची शाळा सुरू झाल्या आहेत.तर लगेचच भाड्याने राहण्याचे परवडणार आहे काय? कमीत कमी पर्यायी जागा शोधण्यासाठी वेळ द्या. सकाळपासून लाईट, पाणी, गॅस नसल्यामुळे उपाशी राहण्याची वेळ आली आहे. किमान १५ दिवसांची मुदत देण्याची मागणी येथील नागरिक करीत आहेत.

ही इमारत खाली करण्यामागे राजकीय अकास असल्याचा दावा येथील नागरिक व्यक्त करीत आहेत. त्याचे सांगितले की, रविवारच्या सुट्टीच्या दिवशी घटनास्थळी पालिकेचे अधिकारी कसे काय उपस्थित झाले. लगेचच त्यांनी नोटीस काढून धोकादायक इमारत म्हणून घोषित केली कशी? या मागे बिल्डरच्या घशात घालण्यासाठी राजकीय अकसापोटी स्थानिक हालचाल चालू आहे... कोणताही तपास न करता पोलीस, महापालिकेची यंत्रणा घेऊन लगेच बिल्डिंग तोडण्यासाठी लाईन गॅस, पाणी लाईन, इमारतीमधील लाईट, रोडवरील दिवे बंद करते, यामागे कोणाचा दबाव अधिकाऱ्यांवर आहे. हे पुढील काळात स्पष्ट होईलच.

पुढे पालिकेच्या मनमानी कारभाराविरूध्द स्थानिक आंदोलन छेडणार असल्याचे सांगितले. त्यासाठी इमारतीच्या आवारतच ठिय्या मांडणार, असा इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे. यापुढे पालिका अधिकारी काय निर्णय घेतात हे पहावे लागेल.

## कल्याणमधील ठाकरे गटाच्या नव्या नेमणुका, सामान्य शिवसैनिकांमध्ये नाराजी

**(पान १ वरून)** मात्र हा आक्षेप खोडून काढतात. डोंबिवलीत अभिजीत सावंत या ज्येष्ठ शिवसैनिकाला शहरप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याविषयी सामान्य, ज्येष्ठ शिवसैनिक कुरबुर करत आहेत. संपर्कप्रमुख गुरूनाथ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली या नेमणुका करण्यात आल्या. त्यांच्या कार्यपध्दतीविषयी शिवसैनिक नाराजी व्यक्त करत आहेत. एकीकडे सामान्य शिवसैनिक हाच शिवसेनेचा कणा आहे, असे सांगायचे आणि निष्ठावंत, सामान्य ज्येष्ठ शिवसैनिकांना डावलून नियुक्त्या करायच्या, यासाठी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी कल्याण, मुरबाड, डोंबिवली परिसरातील नेमणुकांमध्ये लक्ष घालण्याची मागणी सामान्य शिवसैनिकांकडून केली जात आहे. अधिक माहितीसाठी ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख गुरूनाथ खोत यांना संपर्क केला. त्यांनी प्रतिसाद दिला नाही.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त रमजान खत्री यांनी केला शालेय विद्यार्थ्यांचा सत्कार

मिरारोड ( प्रतिनिधी ) – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २५ व्या वर्धापन दिना निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार, राष्ट्रवादी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आणि रायगड लोकसभा खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन सप्ताह साजरा करण्यात आला.

त्यानुसार १४ जून २०२४ रोजी मिरा रोड येथील स्टायलिंग प्लाझा हॉल येथे अजितदादा पवार यांचे समर्थक रमजान एस. खत्री, माजी प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग आणि खत्री एज्युकेशन ट्रस्ट यांनी संयुक्त रित्या २०२४ या वर्षात दहावी आणि बारावी परीक्षेत ७५ टक्के पेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण असलेल्या शाळा व कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात केला. यावेळी पुढील अभ्यासक्रमासाठी सेंट हेरीस शाळेचे प्रोफेसर मजहर खान व एस. के. इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी कदम आणि राष्ट्रवादीचे नेते रमजान एस. खत्री यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्यात लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाला लढविलेल्या चार जागांपैकी फक्त एकच जागा जिंकता आली आहे, याबाबत शहरातील काही पक्ष कार्यकर्त्यांत मरगळ आलेली दिसत असली , तरी मिरा भाईंदर शहरात रमजान खत्री यांनी राष्ट्रवादी पक्षाचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा केला, आणि लोकसभेतील अपयशाची उणीव विधानसभेत भरून काढू असे आत्मविश्वासाने सांगितले.

## ठाणे पोलीस विभागात ६८६ पदांची भरती

### २० चालक पदासाठी १,५२७ अर्ज... ६६६ पोलीस शिपाई पदासाठी ३८,०७८ अर्ज

**ठाण्याच्या साकेत मैदनावर भरती प्रक्रिया**

ठाणे – ठाण्याच्या साकेत मैदनवर १९ जून पासून ठाणे शहर पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. या पोलीस भरतीत ६६६ पदासाठी ३८ हजार ७८ पुरुष आणि महिलांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. पोलिस शिपाईच्या भारतीसाठी ३० हजार १५५ उमेदवारांनी आणि ७ हजार ९२३ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तर चालक पदाच्या २० जागांसाठी १ हजार ५२७ अर्ज प्राप्त झालेले आहेत. यात १ हजार ४०८ पुरुषांनी तर ११९ महिला चालकांनी अर्ज केले आहेत.

ठाणे शहर पोलिस दलाच्या ६८६ पदासाठी होणार्या भारतीचा सुभारंभ हा १९ जून रोजी ठाण्याच्या साकेत परिसरातील पोलिस मैदनवर होणार आहे. साकेत मैदनवर पावसाळी मंडप टाकण्यात आलेले आहे. विविध सूचनाचे दळक लावलेले आहेत. वैद्यकीय सुविधा मैदानी चाचण्याठी दोन ट्रॅक तयार करनायत आलेले आहेत. १०० मिटरचा ट्रॅक धावणीसाठी आणि गोलफेक करिता ७ मैदाने तयार केलेली आहेत. तर १६०० मितची धावांनी चाचणी मात्र पाईपलाईन रोड, बाळकुम येथे घेण्यात येणार आहे. या भारतीच्या बंदोबस्तासाठी १०० पोलिस अधिकारी आणि ५०० पोलिस अमलदार तसेच ७० मंतरलयीन कर्मचारी यांची नेमणूक केलेली आहे. तर पावसामुळे मैदानी चाचणी नाही झाल्यास उमेदवारणा पुन्हा तारीख देण्यात येईल. दोन ठिकाणी अर्ज करणार्यांना दुसर्या ठिकाणच्या चाचणीसाठी सुयोग्य वेळ देण्यात येईल. उमेदवारणा कुठलीही अडचण आल्यास त्याचे निरसन हे स्थानिक पातळीवर करण्यात येईल अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

## ठाणे ग्रामीण पोलीस भरती: ११९ पदांसाठी प्रक्रिया सुरू

### ७०१९ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असून यामध्ये १०१५ महिलांचे अर्ज तर पुरुषांचे ६००४ अर्ज प्राप्त झालेत.

**मुंबई – राज्यातील अनेक भागांमध्ये तरुण मोठ्या संख्येने पोलीस भरती, आर्मी भरतीची तयारी करत असतात. अशातच आता ज्या उमेदवारांनी ठाणे ग्रामीण पोलीस दलात भरती होण्यासाठी अर्ज भरले आहेत. अशा तरुणांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. ठाणे ग्रामीण पोलीस दलाकडून येत्या १९ जून पासून मुंब्रा याठिकाणी मौलाना अब्दुल कलाम आझाद स्टेडीयम येथे आपल्या विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. अशी माहिती ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस.स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.**

### ७०१९ उमेदवारांचे अर्ज प्राप्त..

ठाणे ग्रामीण पोलीस दलामध्ये एकूण ११९ पदांसाठी भरती प्रक्रिया पार पडणार आहे. या सर्व जागांसाठी एकूण ७०१९ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये एकूण १०१५ महिला उमदेवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. तर पुरुष उमेदवारांचे ६००४ अर्ज प्राप्त झाले आहेत. येत्या १९ जून पासून मुंब्रा येथील मौलाना अबुल कलाम आझाद स्टेडीयम येथे ही पोलीस भरतीची प्रक्रिया पार पडणार आहे. असेही डॉ.डी. एस.स्वामी यांनी म्हटले आहे.

## डॉ. श्री. संदिप माने काळाच्या पुढे पाऊल टाकणारा कर्मवीर

मुंबई – डॉक्टरेट पी. एच. डी. म्हणजे . श्री. संदिप माने काळाच्या पुढे पाऊल टाकणारा कर्मवीर आहे. यामुळे ग्रामीण भागातील तसेच गरजू विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी म्हणायला काही हरकत नाही. ग्रामीण भागातील तरुण इंग्लिशमध्ये डॉक्टरेट घेतो ही कल्पनाच मुळात तरुणांना प्रेरणा देणारी आहे. भारत जागतिक ज्ञानसत्ता होण्यासाठी शिक्षणाची भूमिका या विषयावर यशस्वी संशोधन करून जगप्रसिध्द केंब्रिज विद्यापीठ (अमेरिका) कडून डॉक्टरेट प्राप्त केली आहे. तसेच राज्यातील अनेक सेवाभावी संस्था, संघटनांनी अनेक पुरस्कार, सन्मानपत्र देऊन आपला गौरव केला आहे. गोरगरिबांचे कणव असणारे व आर्थिक परिस्थिती नसणारे विद्यार्थी गुरुकुल एज्युकेशन ट्रस्टच्या माध्यमातून आपण अनेक विद्यार्थी दत्तक घेऊन पालकत्व स्विकारले आहे. आपणांस मिळालेल्या संधीचे आपण सोने केले आहे. आपला प्रवास हा इतरांना प्रेरणादेणारा आहे. पुढील वाटचालीसाठी आपणांस अनेक शुभेच्छा. **–सतिश माने**



## रहिवासी पार्किंगबाबत ऑनलाईन लिंकवर माहिती भरण्याचे आवाहन

नवी मुंबई महानगरपालिका बांधकाम नियमावलीतील पार्किंग नियमांच्या अनुषंगाने जनहित याचिका क्र. १२३/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी आदेश पारित करुन नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राच्या बांधकाम नियमावलीमध्ये रहिवास वापराकरिता आवश्यक असलेल्या पार्किंगच्या आवश्यकतेबाबत महापालिका आयुक्त यांनी तज्ज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करावी आणि सदर समितीने सर्वेक्षण व अभ्यास करुन त्याबाबत महानगरपालिकेस व शासनास योग्य त्या शिफारशी कराव्यात असे आदेशित केलेले आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशानुसार महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या बैठका वेळोवेळी पार पडलेल्या असून बांधकाम नियमावलीमध्ये रहिवास वापराच्या पार्किंगच्या आवश्यकतेबाबत नागरिकांकडून ऑनलाईन सर्वेक्षण करणेकरिता प्रश्नावली तयार करण्यात आलेली असून त्यानुसार नवी मुंबई शहरातील नागरिकांकडून सर्वेक्षण करण्याचे ठरविले आहे. सदर सर्वेक्षणाअंती प्राप्त होणाऱ्या माहितीवरुन नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधकाम नियमावलीमध्ये रहिवास वापराकरिता माफक व पुरेशा पार्कींगच्या तरतुदींबाबत तज्ज्ञ समितीस पार्किंगच्या आवश्यकतेच्या अनुषंगाने समितीचा अहवाल महानगरपालिकेस योग्य त्या शिफारशींसह सादर करणे शक्य होईल.

तरी याद्वारे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी यांना आवाहन करण्यात येते की, नवी मुंबई महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेल्या https://forms.gle/vrTFN3kbfFdiLS7M9 या लिंकवर माहिती भरुन सर्वेक्षणामध्ये आपला सहभाग नोंदवावा, जेणेकरुन पार्किंगच्या बाबत नियमावलीतील तरतुदीमध्ये आवश्यकता असल्यास सुधारणा करणेबाबत शासनास नवी मुंबई महानगरपालिकेकडून शिफारस करता येईल.

## खा. डॉ श्रीकांत शिंदे यांनी दिली एक महिन्यात रुग्णवाहिका: निवडणुकीत दिलेला शब्द पाळला



ठाणे बातमीदारः लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांची १५ मे रोजी प्रचार दौऱ्या दरम्यान कळवा पूर्व आनंद विहार फेडरेशन यांनी केलेल्या मागणीनुसार आज दिनांक १७/०६/२०२४ रोजी रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी उद्योजक लक्ष्मण कदम माजी नगरसेवक उमेश पाटील माजी नगरसेवक राजेंद्र साप्ते शहर प्रमुख नरेंद्र शिंदे उपशहर प्रमुख राकेश पाटील आनंद विश्व गुरुकुल संस्थेचे कार्यवाह प्रदीप ढवळ सर कळवा विभाग प्रमुख विजय शिंदे शाखाप्रमुख निनाद बोराडे सहसंघटक कळवा मुंब्रा विधानसभा महिला रचना पाटील सहसंघटक राजेश विराळे शाखाप्रमुख महेश गवारी युवा सेना अध्यक्ष ओंकार चव्हाण युवा सेना प्रमुख योगेश बोरसे विभाग प्रमुख मधुकर भट आनंद विहार फेडरेशनचे अध्यक्ष विष्णू नलावडे ज्ञानेश्वर गावडे नितीन इंगोले मंगल कोळंबेकर गुरुनाथ गोसावी अनिल परब व सर्व सोसायटीचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते याप्रसंगी उमेश पाटील म्हणाले कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी खासदारकीची हॅट्रिक केलेली असून निवडणुकीच्या वेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची फेडरेशन सोबत झालेल्या बैठकीमध्ये दिलेला शब्द पाळला व एका महिन्याच्या आत मध्ये रुग्णवाहिका देण्यात आली कारण कळवा पूर्व येथील परिसरामध्ये रुग्णवाहिका अत्यंत गरजेचे असून २१ इमारतीचे हे संकुलन आहे तसेच येथे कोणतेही मोठे हॉस्पिटल नसल्यामुळे रुग्णवाहिकांची सेवा हीच रुग्णसेवा आहे त्याबद्दल आनंद विहार सोसायटीतील सर्व नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales- RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत

■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव
वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

# पावसाळा आला, सामान्य सर्दीकडे दुर्लक्ष नको

उन्हाळ्याच्या चार महिन्यात तापून निघालेले जीवन पावसाळ्याच्या एका सरीने शांत होऊन जाते व पावसाने आनंदाला पारावार उरत नसतो. पण या पावसाबरोबरच होणार्या सर्दीला आपण लहान सहान आजार म्हणू शकत नाही. कारण तो धोकादायक ठरू शकतो.

सामान्य सर्दी ( कॉमन कोल्ड) हा एक संक्रमिक आजार आहे, जो विषाणूमुळे होतो. तो हवेतून शिंकेद्वारे, आजारी माणसाच्या थेट संपर्कात आल्याने, आजारी माणसाच्या वस्तू हाताळल्याने, नाकातून श्वसन मार्गात संक्रमण करतो. जर एखाद्या व्यक्तीला सर्दी, खोकला व त्याबरोबरच ताप असेल तर ती सौम्य आजाराची पहिली लक्षणे असू शकतात.

सामान्य सर्दीचा कालावधी हा पाच ते सात दिवस असतो. ती नियमित औषध घेतल्याने बरी होते; पण ॲलर्जीक सर्दीसोबत अंगदुखी, ताप ही लक्षणे बरेच दिवस असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याची आवश्यकता असते. सामान्य सर्दीची लक्षणे म्हणजे सतत नाक गळणे, नाकातून पाणी वाहणे, सतत न थांबणार्या शिंका नाक गच्च होणे, डोळ्यातून सतत पाणी येणे अशी असतात. प्रथम सर्दी पाण्यासारखी वाहते. नंतर जंतुसंसर्ग वाढल्यास तीच सर्दी पिवळी व कालांतराने हिरवट सुद्धा होते. तसेच इतर शारीरिक लक्षणे सुद्धा दिसून येतात. म्हणजे ताप येणे, थंडी वाजून येणे, सौम्य व तीव्र प्रकारची अंगदुखी, घशात जळजळ होणे, डोकेदुखी, कान दुखणे, कान गच्च होणे ही सुद्धा लक्षणे आढळून येतात. वैद्यकीय तपासणीमुळे आपणास फ्लू, डेंग्यू, न्यूमोनियासारख्या आजारांबद्दल सर्वसाधारण माहिती मिळू शकते. कारण हे आजार सुरुवातीला सौम्य ताप, सर्दी, खोकला यापासूनच सुरुवात होतात.

बऱ्याचदा लोक डॉक्टरांचा सल्ला न घेता सामान्य सर्दी साठी परस्पर औषधे घेऊन रिकामे होतात; मात्र त्याच्याकडे फक्त व्हायरल इन्फेक्शन किंवा फ्लू असे न समजता योग्य तो डॉक्टरांच्या सल्ला घेऊन औषध व तपासणी करून आजाराचे निदान करणे सुद्धा गरजेचे असते. पूर्ण रक्ताच्या तपासणीने आपणास पांढर्या पेशी , तांबड्या पेशी व चपट्या पेशी यांची माहिती मिळते. तसेच काही प्रमाणात ॲलर्जीक सर्दी व जुनाट सर्दी याचे सुद्धा निदान होते.


### बॅक्टेरियल इन्फेक्शन व व्हायरल इन्फेक्शनपासून बचाव

■ जीवनशैलीत बदल करणे फार गरजेचे आहे. सर्वप्रथम आपण स्वच्छतेवर भर देणे गरजेचे आहे.
■ घरी आल्यावर स्वच्छ हात पाय धुणे.
■ शिंकताना नाकाला तोंडासमोर तर खोकताना तोंडाला रूमाल धरावा.
■ पौष्टिक आहार घेणे गरजेचे आहे.
■ बाहेरचे व उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाणे टाळावे.
■ आहारात योग्य तो बदल करावा.
■ घशाची काळजी घेणे, त्याकरता मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करणे, हे योग्य ठरते.
■ नियमित व वेळोवेळी सॅनिटायझर चा वापर करावा.
■ हलका व्यायाम करावा.

लहान मुलांच्या रोगप्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे पावसाळ्यात मुले सुद्धा सारखी आजारी पडू शकतात . त्यामुळे सामान्य सर्दी झाल्यावर मुलांना जीवनशैलीचे बदल सांगून त्यांना सामान्य सर्दीपासून दूर ठेवू शकतो. कारण जशी शाळा चालू होईल तसे सामान्य सर्दीचे प्रमाण हे जास्त पहायला मिळते. त्यामुळे सामान्य सर्दीचे लक्षण दिसताच योग्य तो डॉक्टर सल्ला घेऊन औषध घेणे गरजेचे असते. त्यामुळे येणारा पावसाळा आपला सुखकर होऊ शकतो.



# रोमहर्षक लढतीत नेपाळला नमवत बांगलादेशने गाठली सुपर८ फेरी



आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ मधील ३७व्या सामन्यात बांगलादेशने दमदार कामगिरी करत नेपाळचा २१ धावांनी पराभव केला. या विजयासह त्याने २०२४ च्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे. सोमवारी झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १०७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात नेपाळचा संघ केवळ ८५ धावाच करू शकला. बांगलादेशसाठी घातक गोलंदाजी करताना तांझिम हसन शाकिबने ४ विकेट्स घेतल्या. नेपाळकडून कुशल मल्लाने सर्वाधिक २७ धावा केल्या. बांगलादेशच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेला नेपाळचा संघ १९.२ षटकांत ८५ धावा करून सर्वबाद झाला. नेपाळच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. मात्र फलंदाजांना विशेष काही करता आले नाही. कुशल मल्लाने ४० चेंडूत २७ धावा केल्या. दीपेंद्र सिंगने ३१ चेंडूत २५ धावा केल्या. सलामीवीर आसिफ शेख १७ धावा करून बाद झाला. त्याने ४ चौकार मारले. सलामीवीर कुशल भुरटेल अवघ्या ४ धावा करून बाद झाला. अशाप्रकारे संघाला २१ धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या बांगलादेशची सुरुवात खराब झाली. पहिल्याच चेंडूवर तांझिद हसनला सोमपाल कामीने बाद केले. तो खाते न उघडताच तंबूत परतला. यानंतर कर्णधार नझमुल हसन शांतोही केवळ चार धावा करून माघारी परतला. या सामन्यात बांगलादेशच्या एकाही फलंदाजाला २० पेक्षा जास्त धावा करता आल्या नाहीत. लिटन दासने १०, शाकीब अल हसनने १७, तौहादी हृदयाने ९, महमुदुल्लाहने १३, झाकेर अलीने १२, तांझिम हसन शाकीबने ३, रिशाद हुसेनने १३, मुस्तफिजुर रहमानने ३ आणि तस्किन अहमदने नाबाद १२ धावा केल्या. नेपाळकडून सोमपाल कामी, दीपेंद्र सिंग एरी, रोहित पौडेल आणि संदीप लामिछाने यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केला.

बांगलादेशने नेपाळला हरवून सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे. त्याने आतापर्यंत ४ सामने खेळले असून ३ जिंकले आहेत. यासोबतच एका सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. बांगलादेशचे ६ गुण आहेत. हा संघ ड गटात आहे. यासह दक्षिण आफ्रिका सुपर ८ मध्ये पोहोचली आहे. बांगलादेश सुपर ८ साठी पात्र ठरल्याने नेदरलँड्सचे स्वप्न भंगले आहे

सुपर८ साठी पात्र ठरलेले दोन्ही गटातील संघ

अ गट
१ - भारत
२ - ऑस्ट्रेलिया
१ - अफगाणिस्तान
२ - बांगलादेश

ब गट
१- अमेरिका
२ - इंग्लंड
३ - वेस्ट इंडिज
४ - दक्षिण आफ्रिका

# तुम्हाला इतरांपेक्षा जास्त घाम येतो का? हे कोणत्या आजाराचे कारण तर नाही ना?


कडक उन्हाळ्यात नेहमीपेक्षा जास्त घाम येणे सामान्य आहे, कारण शरीराला थंडावा देण्याचा हा एक मार्ग आहे. पण, तुम्ही अशा लोकांपैकी एक आहात का ज्यांना इतका घाम येतो की वारंवार कपडे बदलावे लागतात. त्वचा सतत पुसावी लागते, शरीराला दुर्गंधी येते आणि तसेच सामान्य काम करत असतानाही खूप घाम येतो. असे असेल तर तुम्हाला हायपरहाइड्रोसिस नावाचा आजार आहे. याचा अर्थ तुमच्या शरीरातील घामाच्या ग्रंथी अतिक्रियाशील आहेत. यावर दिल्लीतील साकेतमधील मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलचे इंटर्नल मेडिसिनचे डायरेक्टर डॉ. रोमेल टिकू यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

**घाम ग्रंथी काय आहेत?**


आपल्या शरीरात दोन प्रकारच्या घामाच्या ग्रंथी असतात. एक्रिन ग्रंथी, ज्या आपल्या शरीराच्या बहुतेक केस नसलेल्या भागांवर असतात. जसे की तळवे, तळहात आणि कपाळ. त्यानंतर एपोक्राइन ग्रंथी असतात, ज्या केसांच्या कूपांच्या जवळ आढळतात आणि मुख्यतः टाळू, बगल आणि गुदद्वाराजवळ आढळतात. एक्रिन ग्रंथींमधून निघणाऱ्या घामामध्ये ९० टक्क्यांहून अधिक पाणी असते, बाकीचे क्षार असते. एपोक्राइन ग्रंथीमधून निघणारा स्राव बहुतेक चिकट असतो, ज्यात पाणी प्रथिने आणि पोषक घटक मिसळलेले असतात. बॅक्टेरिया असलेल्या त्वचेच्या फोल्डमध्ये घाम येतो, ज्यामुळे शरीरात दुर्गंधी निर्माण होते.

# माझा प्रभाग माझी जिम्मेदारी








गेल्या अनेक दिवसापासून शांतीनगर विभागात गटारीचे घाण पाणी तुंबून रस्त्यावर वाहत होते याची सूचना स्थानिक शाखाप्रमुख यांनी व विभागातील रहिवासी यांनी स्थानिक मा. नगरसेविका मालती ताई रमाकांत पाटील (विधानसभा संघटिका कोपरी पाचपाखाडी) व रमाकांत दादा पाटील (शिवसेना विभाग संघटक) यांना दिले असता युद्धपातळीवर तक्रार संदर्भात महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी बोलून प्रथमत: नाले सफाई करून अडथळा येत असलेल्या गटारीवरील बांधकाम तोडून नाले सफाई करून ताबडतोब जागोजागी गटारांची रिपेरिंग व नवीन चेंबर बसाविण्याचे काम चालू केले त्यामुळे विभागातील नागरिकांनी व महिला वर्गानी माजी नगरसेविका मालतीताई रमाकांत पाटील (शिवसेना महिला विधानसभा संघटिका कोपरी पाचपाखाडी) व रमाकांत (दादा) पाटील (शिवसेना :संघटक कोपरी विभाग), विभाग प्रमुख प्रशांत पाटील, शाखाप्रमुख मनीष साळवे, उपशाखाप्रमुख योगेश नवगिरे, उपशाखाप्रमुख अनिल भालेराव व ठा. म. पा. चे संभंधित अधिकारी यांचे मनपूर्वक आभार मानले तसेच सदर कामासाठी युवासेना कोपरी पाचपाखाडी विधानसभा उपाध्यक्ष धीरज रमाकांत पाटील व युवासेना कोपरी पाचपाखाडी विधानसभा समन्वयक मयूर अशोक ठाकूर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# डोंबिवलीत बेकायदा चाळींवर कारवाई

डोंबिवली: पावसाळा सुरू झाल्याने नैसर्गिक नाले, ओढे, गटारांचे प्रवाह बंद करून उभारण्यात आलेल्या डोंबिवलीतील भोपर, आयरे, २७ गाव भागातील ग आणि ई प्रभागातील बेकायदा चाळी, जोते पालिकेच्या तोडकाम पथकाने जमीनदोस्त केले. या चाळींमुळे परिसरातील सांडपाण्याचे प्रवाह बंद झाले होते. त्यामुळे परिसरात दलदल निर्माण झाली होती. पावसाळ्यात हे सांडपाणी तुंबून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असता. याबाबत पालिकडे नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेऊन ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, ई प्रभागाच्या प्रभारी साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्या तोडकाम पथकाने ही कारवाई केली. आयरे गाव भागात बेकायदा चाळी उभारणीसाठी बांधलेले १० जोते तोडण्यात आले. दोन बेकायदा चाळी जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट करण्यात आल्या. भोपर येथील १५ खोल्यांच्या चाळी, रस्ते अडवून लावलेल्या टपऱ्या तोडण्यात आल्या. आयुक्त डॉ. इंदूराणी जाखड नालेसफाईच्या दौऱ्यावर असताना त्यांना ही बेकायदा बांधकामे दिसून आली होती. त्यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली.

## इमारतींच्या सांडपाण्याचा त्रास परिसरातील नागरिकांना



डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभागात जुनी डोंबिवलीत प्रकाश गोठे, शंकर ठाकूर यांनी गटार तोडून, सामासिक अंतर न ठेवता फशी हाईट्स, अन्य एक अशा दोन बेकायदा इमारती उभारल्या आहेत. या इमारतींच्या सांडपाण्याचा त्रास परिसरातील नागरिकांना होत आहे. राहुलनगरमध्ये सुदामा रेसिडेन्सी, रमाकांत आर्केड या इमारतींलगत गटारे नाहीत. कोपर रेल्वे स्थानकाजवळील शैलेश पाटील यांनी कोंबड्याचा बेकायदा खुराडा सुरू केल्याने परिसरात दुर्गंधीला सुरूवात झाली आहे. ठाकुरवाडीत शाळेच्या आरक्षणावर शिवलिला बेकायदा इमारत उभारण्यात आली आहे. कोपर मधील चरू बामा म्हात्रे शाळेच्या पाठीमागे जुनाट झाडे तोडून बेकायदा इमारतीचे काम सुरू करण्यात आले आहे. कुंभारखाणपाडा खंडोबा मंदिरा जवळ बेकायदा इमारतीचे काम सुरू आहे. गणेशनगरमध्ये रेल्वे मैदानालगत बेकायदा इमारत सुरू आहे. कुंभारखाणपाडा येथे अंजिक्य नारकर यांच्या तोडलेल्या इमारतीचा एक भाग गेल्या महिन्यात पुन्हा उभारण्यात आला आहे. डोंबिवली पूर्वेत फ प्रभागात सुयोग हॉल गल्लीत आराधना ही सात माळ्याची बेकायदा इमारत निवासयोग्य करण्याच्या हालचाली भूमाफियांनी सुरू केल्या आहेत. त्याची पालिका दखल घेऊन कारवाई करत नसल्याच्या तक्रारी परिसरातील रहिवाशांकडून, तक्रारदारांकडून केल्या जात आहेत.

# जय शिवसंग्रामला महायुतीचा घटक पक्ष म्हणून मान्यता




मुंबई : भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या मान्यतेने जय शिवसंग्राम या पक्षाला महायुतीच्या घटक पक्षात सामावून घेतले असल्या बाबत महायुतीचे मुख्य प्रवक्ते प्रसाद लाड यांनी अधिकृत पत्र जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांच्या शिष्टमंडळाला दिले. याप्रसंगी पक्षाच्या ठाणे जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा स्वाती कदम-जाधव आणि इतर महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पक्षाच्या स्थापनेनंतर अवघ्या चार महिन्यात स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांच्या स्वप्नांना बळ देण्यात यश मिळाल्याने राज्यभरातील जय शिवसंग्राम सैनिकांमधून उस्फूर्तपणे स्वागत होत आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये जय शिवसंग्रामला प्रमुख घटक पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली आहे. लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांनी त्यावेळी सत्तेला लाथ मारून विरोधी पक्षात असलेल्या भाजपाला जाहीरपणे साथ दिली होती. मेटे साहेबांनी मराठा आरक्षण आणि महायुतीला बिनशर्त पाठबळ कायम दिले. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर यामध्ये जी पोकळी निर्माण झाली होती ती पोकळी भरून काढण्यात स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे लहान बंधू रामहरी मेटे यांना यश मिळाले आहे.त्यांनी अवघ्या चार महिन्यापूर्वी जय शिवसंग्रामची स्थापना स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी स्थापन केली. राज्यभरातील मेटे समर्थकांनी मोठ्या संख्येने जय शिवसंग्राम पक्षामध्ये प्रवेश करत जय शिवसंग्रामला स्वीकारले आहे. जय शिवसंग्राम पक्षामध्ये दिवसेंदिवस मेटे साहेबांचे प्रमुख पदाधिकारी यांच्यासह नवीन विचारधारेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने पक्षप्रवेश करत आहेत. जय शिवसंग्रामची अवघ्या चार महिन्यातील ही उभारी लक्षात घेऊन महायुतीने जय शिवसंग्रामला महायुतीचा घटक पक्ष म्हणून स्वीकारले आहे.

# खारघरच्या फेरीवाल्यांकडून हप्ते वसूली

पनवेल : खारघर वसाहतीमध्ये रस्त्यांवर बेकायदा फेरीवाले आणि फेरीवाल्यांविरोधात तक्रारी करणारे यांच्यातील संघर्ष खारघर पोलीस ठाण्यापर्यंत पोहचला आहे. खारघर पोलीस ठाण्यात याबाबत शनिवारी तीन खंडणी व विनयभंगाच्या तक्रारी नोंदविल्या गेल्या. तसेच ज्याच्याविरोधात तक्रार नोंदविली गेली त्याने जातीवाचक शिवीगाळ व मारहाणीची तक्रार या फेरीवाले व त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात पोलिसांत दिली आहे. खारघर वसाहतीमधील लिटीलवर्ल्ड मॉलसमोरील गुरुप्रसाद हॉटेल समोरील रस्त्यावर कानबाली विकणारे फेरीवाले जावेद खर्शिद सय्यद यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार राकेश हरकुळकर, शाहीद शेख आणि संतोष चाळके यांना प्रतिदिन ५० रुपये व्यवसाय केल्यावर न दिल्यास या फेरीवाल्यांविरोधात पनवेल महापालिका आणि पोलिसांत फोटो पाठवून तक्रार करु अशी धमकी दिल्याचे म्हटले आहे. दुसऱ्या घटनेत राकेश हरकुळकर यांनी दिलेल्या तक्रारीत हरकुळकर हे अनुसूचित जमातीचे असल्याने त्यांच्यावर शनिवारी सायंकाळी सात वाजता पांढऱ्या रंगाच्या फॉर्चुनर मोटारीतून आलेल्या दोन व्यक्तींसह कानातले विकणारा एका व्यक्ती, दोन महिला व इतरांनी येऊन त्यांना जातीवाचक शिवीगाळ व धमकावले. यातील काही व्यक्तींनी राकेशला मारहाण केल्याचे पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

ऐरोली सेक्टर १० येथील खाडीकिनारी

# जनसहभागातून विशेष स्वच्छता मोहीम

नवी मुंबई : 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' ला सामोरे जाताना नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून यामध्ये नागरिकांचा सहभाग करून घेण्यावर भर देण्यात येत आहे. अशाच प्रकारची विशेष स्वच्छता मोहीम अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ अजय गडदे, परिमंडळ २ उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली सेक्टर १०, ऐरोली येथील जैवविविधता केंद्राशेजारील खाडी किनाऱ्याच्या ठिकाणी राबविण्यात आली. यामध्ये ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त अशोक अहिरे, स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांचेसह स्वच्छता निरीक्षक, सफाई मित्र, पर्यवेक्षक, श्रीम. सुशीलादेवी देशमुख विद्यालयातील एनएसएसचे विद्यार्थी तसेच दिवा कोळीवाडा व परिसरातील रहिवाशी यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

यावेळी स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांनी उपस्थितांना पर्यावरणाचे महत्व पटवून दिले तसेच त्यांच्यामध्ये पर्यावरण विषयक जागरूकता करून प्लास्टिक प्रतिबंधाबाबत मार्गदर्शनही केले. याप्रसंगी प्लास्टिक वापर प्रतिबंधाबाबत शपथही घेण्यात आली.

निरंजन डावखरे यांना पाठिंबा देत कोचिंग क्लासेस संघटनेची माघार


# पदवीधर मतदारसंघातून अमोल जगताप यांची उमेदवारी मागे




ठाणे : कोकण पदवीधर मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार निरंजन वसंत डावखरे यांना वाढता पाठिंबा मिळत असून, निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या कोचिंग क्लासेस संचालक संघटनेनेही उमेदवार अमोल जगताप यांची उमेदवारी माघारी घेतली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रविवारी सायंकाळी ठाण्यात झालेल्या सभेत कोचिंग क्लासेस संचालक संघटनेने महायुतीला पाठिंबा जाहीर केला. कोचिंग क्लासेस संचालक संघटनेला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन आमदार निरंजन डावखरे यांनी दिले. त्याचबरोबर कोचिंग क्लासेस संघटनेच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक असल्याची ग्वाही दोन्ही नेत्यांनी दिली. संघटनेचे अध्यक्ष सतीश देशमुख व सचिव अॅड. सचिन सरोदे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आमदार डावखरे यांना पाठिंबा असल्याचे पत्र प्रदान केले. तसेच त्यांच्या प्रचारात सक्रिय राहणार असल्याची ग्वाही दिली.



कोपरी येथील मीठबंदर रोड येथील श्रमदान सोसायटी बिल्डिंग ३ च्या तिसऱ्या मजल्यावरील प्लास्टर पडल्याने बिल्डिंग सील करण्यात आली. (छाया : मनोज सिंह)



कळवा येथील कावेरी सेतू जवळील नाला साफच केला नसल्याचे निदर्शनात. (छाया : मनोज सिंह)

# कळंबोली ठरणार सर्व प्रकारच्या सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे केंद्र : आ. प्रशांत ठाकूर




पनवेल : कळंबोलीमध्ये वारी या सर्व प्रकारच्या सौर ऊर्जा प्रकल्पांचे निर्माते असणाऱ्या संस्थेची फ्रँचाईजी कळंबोली येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. जगतकर्ता इंडस्ट्रीज यांच्या माध्यमातून संपूर्ण रायगड जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करणाऱ्यांकरता साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. ते वारी या निर्मिती कंपनीचे ऑथराईज फ्रेंचायसी पार्टनर आहेत. या शोरूमचे उद्घाटन आज (सोमवार, दि. १७ जून) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. त्यांनी जगतकर्ता इंडस्ट्रीजचे संचालकांना यशस्वी वाटचाली करता शुभेच्छा दिल्या तसेच पुनर्वापर युक्त आणि हरित ऊर्जा वापराच्या प्रक्रियेमध्ये योगदान दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

उद्घाटनानंतर आपले मनोगत व्यक्त करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ध्येय धोरणातून ऊर्जा मंत्रालयाच्या माध्यमातून पुनर्वापर योग्य ऊर्जा आणि हरित ऊर्जा वापरण्यावर भर दिला जात आहे. पर्यावरणपूरक असणाऱ्या या ऊर्जेच्या वापरामुळे ग्राहकांच्या खिशावरचा भार देखील हलका होणार आहे. सौर ऊर्जा व अन्य हरित ऊर्जा यांचा वापर वाढावा यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार विविध योजनांच्या माध्यमातून सकारात्मक प्रयत्न करत आहेत. फार्म हाऊस, मोकळ्या जागा, इमारतीवरील जागा या ठिकाणी सौर ऊर्जा निर्मितीची प्रक्रिया कार्यान्वित केल्यास घरोघरी वीज निर्मिती केंद्र उघडले जाऊ शकतील. ते पुढे म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यामध्ये एक करोड पेक्षा जास्त नागरिक अशा स्वरूपाची घरोघरी ऊर्जा केंद्र निर्मिती करण्यास तयार असल्याचे समोर आले आहे. अशाप्रकारे वीज निर्मिती केल्यास सध्या वीज निर्मितीसाठी लागणारे कोळसा, इंधन यांची देखील बचत होण्यास फार मोठी मदत होईल.जगतकर्ता इंडस्ट्रीजच्या माध्यमातून वारी यांचे सौर ऊर्जा निर्मिती साहित्य पनवेल परिसरातील नागरिकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल मी कंपनीचे तसेच त्यांचे संस्थापक संचालक नागेंद्रसिंग आणि आशिष सिंग यांचे आभार मानतो.

या उद्घाटन सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या समवेत जगतकर्ता इंडस्ट्रीजचे संस्थापक संचालक नागेंद्र सिंग, आशिष सिंग, शिवसेनेचे पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, पम पाचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील, वारीचे फ्रँचाईजी मॅनेजर राजेश लाटे, अॅड. रमेश त्रिपाठी, अविनाश पाटील, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, भाजपचे कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते..

# लोकसभा निवडणुकीत माझ्या विजयासाठी तुम्ही घेतलेले कष्ट मी आयुष्यभर विसरणार नाही : खा. श्रीरंग बारणे

पनवेल : लोकसभा निवडणुकीत माझ्या विजयासाठी तुम्ही घेतलेले कष्ट मी आयुष्यभर विसरणार नाही. आता मिळालेल्या मतदानाचा सकारात्मक विचार करून आपण विधानसभा निवडणुकीच्या तयारी लागूया. पनवेलमधून आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणमधून आमदार महेश बालदी निश्चित विजयी होतील, असा दावा मावळ लोकसभा मतदारसंघाचे सलग तीन वेळा विक्रमी मताधिक्याने निवडून आलेले खासदार श्रीरंग बारणे यांनी पनवेल येथे रविवारी (दि. १६) आपल्या भव्य नागरी सत्कार सोहळ्यात बोलताना केला.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदार संघाचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे, भाजप उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, भाजप ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उप जिल्हाप्रमुख परेश पाटील, राष्ट्रवादीचे कॉंग्रेसचे नेते शिवदास कांबळे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविक रमेश गुडेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, भाजप, आरपीआय, मनसे व शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी बोलताना या निवडणुकीत आपण प्रामाणिक प्रयत्न केले, पण मतदारात गैरसमज निर्माण करून देण्यात विरोधी पक्ष यशस्वी झाला. संविधान बदलणार म्हणून सांगितले. आता केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आले आहे. संविधानात कोणताही बदल होणार नाही हे लोकांना समजेल. यापूर्वी काम करताना काही चुका झाल्या असतील त्या सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी सकारात्मक विचार करून गावा-गावात जाऊन लोकांचे गैरसमज दूर करा. कोकण पदवीधर मतदार संघात निरंजन डावखरे यांना मतदान करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सोहळ्याच्या अध्यक्षपदावरून बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खासदार श्रीरंग बारणे यांचा सत्कार यापेक्षा मोठा भव्य दिव्य व्हावा, अशी आपली इच्छा होती. देशात आपले सरकार आले आहे, मग आपल्यात उत्साह का नाही? गुपचुप का राहण्याचे काही कारण नाही उत्साहाने काम केले पाहिजे. आपण कोठे कमी पडलो याचा अभ्यास करायचा आणि संरक्षणात्मक भूमिका न घेता आक्रमक भूमिका घ्यायची आहे. इथले प्रश्न घेऊन लोकांच्यात जाऊ म्हणजे लोक आपल्याबरोबर येतील. स्टेजवर भाषण करण्यापेक्षा गावागावात जाऊन त्यांचे प्रश्न सोडवूया. विरोधकांना त्यांची जागा दाखवून देऊ या असे सांगून त्यांनी खा. श्रीरंग बारणे यांच्या कार्याचे कौतुक केले.




आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, महायुतीतल्या सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते ज्यांनी या निवडणुकीमध्ये आप्पांचा विजय साध्य करण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली अशा सर्व कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन व मनापासून धन्यवाद. या देशांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या पद्धतीने २०१४ सालापासून या देशाच्या विकासासाठी काम केले त्याला देशातल्या जनतेने कौल दिला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार लागोपाठ तिसर्यांदा बहुमताने या ठिकाणी सत्तेमध्ये सहभागी झाले त्याबद्दल त्यांचेसुद्धा आपण मनापासून अभिनंदन करूया. या मतदारसंघाचे खासदार म्हणून आप्पांनी गेल्या दहा वर्षांमध्ये सातत्याने या मतदार संघाचे विषय हेरी संसदेमध्ये लोकसभेमध्ये मांडलेले आहेत. आप्पांनी नवी मुंबई विमानतळ नामांतराचा प्रश्न, सिडकोतील प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न, विमानतळामुळे येणारे प्रकल्प व त्यावर आधारित प्रशिक्षण येथील प्रकल्पग्रस्तांना देणे, पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्राकडून मिळणारा निधी, पनवेल रेल्वे स्टेशनच्या प्रश्नांकडे खासदार श्रीरंग बारणे यांनी लक्ष वेधले आहे.

यावेळी कोकण पदवीधर मतदार संघाचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांनी बोलताना महायुतीला लोकसभेला जरी अपेक्षित यश भेटले नाही तरीही महायुतीचा कार्यकर्ता हा कुठेही खचला नाही. ताकतीने सातत्याने लढण्याची भूमिका ठेवत. प्रत्येक निवडणूक येत्या काळामध्ये आपल्याला ताकतीने लढायची आहे. या पद्धतीची भूमिका आपण सगळ्यांनी घेतली आणि त्याच अनुषंगाने येणार्या २६ तारखेला आपली पदवीधर मतदारसंघाची निवडणूक आहे. पाच जिल्ह्यांचा हा मतदार संघ ठाणे जिल्हा रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग आणि पालघर म्हणजे चांदा ते बांदा असा हा मतदार संघ आहे आणि या मतदारसंघांमध्ये प्रत्येक मतदान हा आपल्याला मतदानासाठी नेण्याची यंत्रणा ही सातत्याने पक्षाच्या वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमांनी आपण लावत चाललोय. आपण अतिशय चांगल्या पद्धतीचे नियोजन केले आहे. येत्या २६ तारखेला मतदार काढण्याच्या संदर्भातली विनंती करतोय. सर्व मतदारांपर्यंत संदेश जाणे गरजेचे आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१